दिनांक : .१२.२०१९

**प्रति,**
**मा. पंतप्रधान,**
भारत सरकार, नवी देहली ११०००१.

**विषय : महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशात कठोर कायदा लागू करणे, महिलांना विशेष सुरक्षा पुरवणे आणि अत्याचारी नराधमांना शीघ्रतेने अन् कठोरात कठोर शिक्षा करणे यांविषयी....**

महोदय,

संपूर्ण देशाला मान खाली घालायला लावणारी घटना नुकतीच हैदराबाद येथील शमसाबाद (जि. रंगारेड्डी, तेलंगाणा राज्य) येथे घडली. एका डॉक्टर युवतीवर दुचाकीचे पंक्चर काढण्याच्या बहाण्याने ट्रकचालक, क्लीनर आणि अन्य दोघांनी तिचे रात्री अपहरण करून सामूहिक बलात्कार केला; इतकेच नव्हे, तर तिला जिवंत जाळून तिची निर्घृण हत्याही केली. या नराधमांनी घटनास्थळावरून ३० किमी अंतरावर असलेल्या एका पुलाखाली निर्जनस्थळी तिचा मृतदेह पेट्रोल टाकून जाळला. ही घटना अतिशय सुन्न करणारी आणि कितीही निषेध केला, तरी कमीच आहे, अशी आहे. या प्रकरणी पोलिसांनी महंमद पाशा आणि अन्य ३ जणांना अटक केली आहे.

या प्रकरणामुळे देशातील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणामुळे तेलंगाणासह देशभर संतापाची लाट उसळली असून देशभर विविध प्रकारे या घटनेचे पडसाद उमटत आहेत. तेलंगाणा येथे प्रक्षुब्ध झालेल्या जमावाने पोलीस ठाण्यावर जोड्यांचा मारा केला, तर काही ठिकाणी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे 'रस्ताबंद' आंदोलन केले. गेल्या काही वर्षांत भारतात बलात्कार आणि महिलांवर होणारे अत्याचार आता नित्य बनत आहेत. सर्वपक्षीय राज्यकर्ते, सर्वपक्षीय सरकारे आणि लोकप्रतिनिधी महिलांवरील अत्याचार रोखण्यास आणि महिलांना सुरक्षा पुरवण्यात वारंवार अपयशी ठरतांना दिसत आहेत.

*** तरी यासंदर्भात काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत....**

**अ. तेलंगणमध्ये झालेल्या काही घटना :**

१. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो) अहवालात वर्ष २०१७ मध्ये तेलंगाणा राज्यात १८ ते ३० वर्षांच्या महिलांच्या संदर्भात सर्वाधिक गुन्हे घडल्याचे म्हटले आहे. या वयोगटातील महिलांवरील बलात्काराची ९१ टक्के प्रकरणे समोर आली असून ही टक्केवारी देशभरातील अशा घटनांमध्ये अधिक आहे.

२. रंगारेड्डी जिल्ह्यातच दिनांक ४.११.२०१९ ला तहसील कार्यालयात जमिनीच्या संदर्भात वाद झाल्याने के. सुरेश या मालमत्ता खरेदी-विक्रीतील दलालाने महिला तहसिलदार विजया रेड्डी यांच्यावर पेट्रोल ओतून त्यांना जिवंत जाळले. यामध्ये विजया रेड्डी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

३. रंगारेड्डी जिल्ह्यातच १५ वर्षांच्या एका विद्यार्थिनीवर शाळेच्या मुख्याध्यापकांनी बलात्कार केला. याचसमवेत आसिफाबाद जिल्ह्यात एका महिलेवर बलात्कार केल्यानंतर तिची हत्या करण्यात आली होती. वारंगल येथे एका १९ वर्षांच्या तरुणीची तिच्याच प्रेमीने बलात्कार करून तिची हत्या केली. ही यादी न संपणारी आहे.

**आ. देशभरातील महिलांच्या असुरक्षिततेविषयी :**

१. तेलंगाणा येथील घटना ताजी असतांनाच १ डिसेंबर या दिवशी रांची येथील एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर १२ जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना झाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी १२ जणांना अटक केली आहे.

२. वर्ष २०१२ मध्ये देहली येथे निर्भया प्रकरण झाल्यावर देशभरात दबाव वाढवल्यावर तत्कालीन काँग्रेस शासनाने कडक कायदा केला खरा; पण त्यानेही महिलांवरील अत्याचार कुठेच अल्प झाले नाहीत. उलट प्रत्येक राज्यात त्याची

आकडेवारी वाढतच आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार वर्ष २०१२ पासून बलात्काराचे नोंद होणाऱ्या गुन्ह्यांची आकडेवारी ही प्रत्येक वर्षी वाढलेलीच आहे.

३. देशात महिलांविषयीच्या गुन्ह्यांमध्ये वर्ष २०१७ मध्ये ६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वर्ष २०१७ मध्ये संपूर्ण देशात महिलांवरील अत्याचारांशी संबंधित ३ लाख ५९ सहस्र ८४९ गुन्हे नोंद झाले होते. वर्ष २०१६ मध्ये ही संख्या ३ लाख ३८ सहस्र ९५४ एवढी होती. महाराष्ट्रापुरता विचार केल्यास राज्यात प्रतिदिन १२ बलात्कार होत असून विनयभंगाच्या ३४ घटना प्रतिदिन, तर २० अपहरणाच्या घटना होत आहेत.

४. बलात्कार पीडितांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी केंद्र सरकारकडून स्थापन करण्यात आलेल्या 'निर्भया निधी'तून राज्य सरकारांना देण्यात आलेल्या पैशांचा मोठ्या प्रमाणात वापरच करण्यात आलेला नाही, असे महिला आणि बालकल्याण मंत्रालयाने संसदेत दिलेल्या उत्तरातून स्पष्ट झाले. तसेच महाराष्ट्रासारख्या राज्यात यासाठी १४,००० कोटींहून अधिक निधी पडून असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. महिलांच्या साहाय्यासाठी उभारलेल्या निधीचा त्यांच्यासाठी उपयोगच न होणे, ही प्रशासनाच्या असंवेदनशीलतेची परिसीमाच म्हणावी लागेल.

५. सध्या वर्षानुवर्षे न्यायनिवाडा चालल्यामुळे गुन्ह्याचे गांभीर्य अल्प होत जाते. मधल्या काळात जामीन मिळवण्याचे प्रयत्न होतात. शिक्षा झालीच तर दयेचा अर्ज प्रविष्ट करता येतो. वर्ष २०१२ मध्ये घडलेल्या निर्भया प्रकरणातील आरोपींच्या शिक्षेची कार्यवाही अद्याप झालेली नाही. यानंतर घडणाऱ्या घटनांना 'निर्भया २', 'निर्भया ३' आदी नावे देऊन जागृती केली जात आहे; मात्र अशा आणखी किती 'निर्भया' प्रकरणे होऊ द्यायची आहेत ? शिक्षा मिळण्याची स्थिती जर अशी असेल, तर पीडितेला न्याय मिळणे दूरच, शिक्षेची जरब लोकांमध्ये कशी बसणार ? याउलट अन्य देशांत शिक्षेची कार्यवाही अतिशय कठोर आणि अल्पावधीत केली जाते. उदा.

अ. उत्तर कोरिया : बलात्काऱ्यांना सर्वांसमोर डोक्यात गोळी झाडली जाते.

आ. संयुक्त अरब अमिरात (युएई) : ७ दिवसांत फाशीची शिक्षा

इ. सौदी अरेबिया : सार्वजनिक ठिकाणी शिरच्छेद, फाशी किंवा गुप्तांग कापणे

ई. अफगाणिस्तान : सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगाराच्या डोक्यात गोळी घालून त्याला ठार मारणे

उ. इजिप्त : ७ दिवसांत फासावर लटकवणे

ऊ. पोलंड : डुकरांच्या साहाय्याने आरोपींना जिवे मारणे, आरोपींना नपुंसक बनवणे

ए. इंडोनेशिया : आरोपींना नपुंसक बनवणे

६. कोणताही समाज हा शिक्षेचे भय पाहूनच चुकीची कृत्ये करण्यापासून धजावत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यात महिलांवरील अत्याचार करणाऱ्याचा 'चौरंगा' (दोन हात आणि दोन पाय तोडणे) करण्याची कठोर शिक्षा दिली जात होती. या शिक्षेनंतर पुन्हा कोणी महिलांवर अत्याचार करण्याचा विचारही करत नसत. बलात्कार करण्याचा विचार करण्यापूर्वीच त्यामुळे किती कठोर शिक्षा होऊ शकते, हे लक्षात आले, तरच बलात्कारांचे प्रमाण कमी होण्याची शक्यत आहे. अन्यथा दिवसेंदिवस हे प्रमाण वाढतच चालले आहे. आजघडीला भारतात प्रती १८ मिनिटाला एक बलात्कार होत आहे. ही स्थिती पालटण्यासाठी कठोरात कठोर शिक्षा हाच उपाय आहे.

७. बलात्काराच्या प्रकरणांमध्ये पोलिसांनी जबाबदारीने वागले पाहिजे; मात्र काही प्रकरणांत तसे होतांना दिसत नाही. या प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांनी 'मृत युवतीने तिच्या बहिणीला फोन का केला', 'पोलिसांना फोन केला असता तर वाचली असती' आदी अत्यंत आक्षेपार्ह विधाने केली. तसेच या प्रकरणातील चार आरोपींना पोलीस कोठडी न मिळता, न्यायालयीन कोठडी मिळाली. यातून पोलिसांनी न्यायालयात त्यांच्याविषयी किती सक्षमतेने आणि जोरकसपणे बाजू मांडली, पोलीस कोठडीची मागणी केली आदी सूत्रे विचारात घेण्यासारखी आहेत. इतकेच नव्हे, तर न्यायालयीन कोठडीत असलेल्या या नराधमांना भोजनामध्ये मटणकरीची मेजवानी देण्यात आली. या सर्व गोष्टी पोलिसांची या प्रकरणातील असंवेदनशीलताच दर्शवतात.

*** याविषयी आमच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत....**

१. महिला अत्याचाराची प्रकरणे हाताळण्यासाठी आणि महिलांशी संबंधित आरोपींचा शोध घेण्यासाठी केंद्र आणि राज्य स्तरावर पोलिसांची विशेष शाखा स्थापन करावी.

२. महिलांवरील अत्याचाराचे खटले जलदगती न्यायालयात चालवावेत, दोषींना लवकरात लवकर आणि कठोर शिक्षा केली जावी. तसेच त्या शिक्षेची अंमलबजावणीही तात्काळ व्हावी.

३. महिलांना स्वसंरक्षण प्रशिक्षण मिळण्यासाठी व्यवस्था ठिकठिकाणी उपलब्ध करून द्यावी. उदा. शाळा-महाविद्यालये

४. महिलांमध्ये याविषयी जागृती होण्यासाठी व्याख्याने, चर्चासत्रे आदी कार्यक्रम आयोजित करावेत.

५. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे व्यक्तीला गुन्हेगार बनण्यापासून रोखण्यासाठी नैतिक मूल्यांचे शिक्षण लहानपणापासून द्यायला हवे. व्यक्तीच नीतीमान असेल, तर तो अपराध करणारच नाही. त्यामुळे प्रत्येक शाळेत नैतिक मूल्यांचे शिक्षण या विषयाअंतर्गत आदर्श व्यक्ती घडण्यासाठी काय करावे, अपराध केल्याचे दुष्परिणाम, त्याचे गांभीर्य, व्यक्ती-कुटुंब-समाज यांवर होणारे परिणाम आदींविषयी समाजाला शिक्षित करायला हवे.

६. वरील सूत्रांचा अंतर्भाव करत महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकारने तात्काळ कठोर कायदा करून तो देशभरात शीघ्रतेने लागू करावा.

७. बलात्कारासारख्या संवेदनशील प्रकरणांत असंवेदनशीलता दाखवणाऱ्या, आरोपींना सहानुभूती दाखवणाऱ्या पोलिसांवरही कारवाई करण्यात यावी.

आपले विश्वासू,